# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/01/2024 (बुधवार) दुपार

---

### नागपूर ग्रामीण येथील सेवानिवृत्त
### पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निरोप समारंभ
### तसेच ०५ पोलीस अंमलदारांना पदोन्नती बहाल

दिनांक ३१/०१/२०२४ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण) येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **"निरोप समारंभाच्या"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) पोलीस निरीक्षक श्री. प्रदीपकुमार शेवाळे, नियंत्रण कक्ष नागपूर ग्रामीण २) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. रघुनाथ वानखेडे, सुरक्षा शाखा नागपूर ग्रामीण ३) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. शालीकराम महाजन पोलीस स्टेशन कन्हान, ४) पोलीस हवालदार श्री. महेंद्रसिंग गौर, पोलीस महामार्ग खुर्सापार नागपूर ग्रामीण यांना पोलीस उप अधिक्षक (गृह) श्री. विजय माहुलकर, नागपूर ग्रामीण यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी अंमलदारांना पोलीस उप अधीक्षक (गृह) यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलीस उप अधीक्षक (गृह) यांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस उप अधीक्षक (गृह) यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांची प्रशंसा केली.

तसेच पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर आस्थापनेवरील ०५ अंमलदार यांना पदोन्नती मिळाली आहे. यामध्ये ०३ पोलीस नायक यांना पोलीस हवालदार पदावर, ०२ पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. याबाबतचे आदेश दि. ३० जानेवारी २०२४ रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. यामध्ये महिला पोलीस नायक मेघा वाघाटे जिल्हा विशेष शाखा, पोलीस नायक निकीता कावळे जिल्हा विशेष शाखा, पोलीस नायक सुरज भोयर पोस्टे कळमेश्वर यांना पोलीस नाईक पदावरून पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती देण्यात आली. तसेच पोहवा अनिल व्यवहारे पोस्टे बोरी, पोहवा विजय डोंगरे नागरी हक्क संरक्षण विभाग नागपूर परीक्षेत्र यांना पोलीस हवालदार पदावरून सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आली. यावेळी पोलीस उप अधीक्षक (गृह) नागपूर ग्रामीण श्री. विजय माहुलकर यांनी पदोन्नती मिळालेल्या सर्व अंमलदार यांचे अभिनंदन केले आहे.

या कार्यक्रमाला उप पोलीस अधीक्षक (गृह) श्री. विजय माहुलकर व कार्यालयातील जिल्हा विशेष शाखा ना.ग्रा पोलीस निरीक्षक श्री. अजय मानकर, महिला अंमलदार मिरा केंद्रे इतर अधिकारी व अंमलदार (स्टाफ) उपस्थित होते.









पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर